**निधी वितरण २०१९-२०**
मागणी क्र.- बी ११- मुख्य लेखाशीर्ष-७६१०
शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे.

दी.प्र. मं. म.सा.. मुंबई
0 6 ~15
16 NOV 2019
31 3 9
आवक क्रमांक : N-8381

# महाराष्ट्र शासन

गृह विभाग
शासन निर्णय क्र.- बीयुडी ०५१९/प्र.क्र.१४५/आस्था-१.
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :१५ नोव्हेंबर,२०१९.

**वाचा** :- १. शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.- अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.८/७/२०१९.
२. शासनाचा समक्रमांकाचा शासन निर्णय, दि.२०/५/२०१९ .

**प्रस्तावना :-**

वित्तीय वर्ष २०१९-२०साठी मागणी क्र.- बी ११, मुख्य लेखाशीर्ष ७६१०- शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे अंतर्गत एकूण रु. ११७,२८,०१,०००/- (रुपये एकशे सतरा कोटी अठ्ठावीस लक्ष एक हजार फक्त) इतक्या अर्थसंकल्पीय तरतुदीपैकी एक तृतीयांश मर्यादेत अधिनस्थ कार्यालयांच्या मागणीनुसार रु.३८,०९,३२,०००/-(रुपये अडतीस कोटी नऊ लक्ष बत्तीस हजार फक्त) इतके लेखा अनुदान दि.२०/५/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आले आहे.आता, वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/ अर्थ-३,दि.८/७/२०१९ नुसार एकूण वार्षिक तरतुदीच्या ६०% च्या मर्यादेत रु.७०,३६,८०.६००/- (सत्तर कोटी छत्तीस लक्ष ऐंशी हजार सहाशे फक्त) या बिम्सवर उपलब्ध निधीपैकी रु.१७,७७,४८.६००/- (सतरा कोटी सत्यात्तहर लक्ष अठ्ठेचाळीस हजार सहाशे फक्त ) इतका निधी गृह विभाग (खुद्द) व गृह विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयांना (मागणीप्रमाणे) वाटप करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता मागणी क्र.- बी-११, मुख्य लेखाशिर्ष ७६१०- शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे अंतर्गत अर्थसंकल्पीय संगणक प्रणालीद्वारे उपलब्ध करून देण्यात आलेल्या प्रथम नऊ महिन्यांकरिता (डिसेंबर,२०१९अखेर) वार्षिक तरतूदीच्या ६०% च्या मर्यादेत खर्च करण्यासाठी उपशीर्ष व बाबनिहाय तरतूद, सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पीय अनुदान व एक तृतीयांश मंजूर अनुदान याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

( रुपये हजारात )

| उपलेखाशिर्ष | २०१९-२० अर्थसंकल्पीय अनुदान | एक तृतीयांश मंजूर अनुदान | ६०% मंजूर अनुदान | ६०% मर्यादेत प्रस्तावित अनुदान |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ५ | ६ |
| ७६१०००८७,२०१- घरबांधणी अग्रीम | १०३५००० | ३४५००० | ६२१००० | १३१००० |
| ७६१०००९६,२०२- मोटार वाहन अग्रीम | १०७८०० | ३५९३२ | ६४६८० | २८७४८ |
| ७६१०००९६,२०३- इतर वाहन अग्रीम | १ | ० | ०.६ | ०.६ |
| ७६१०००९६,२०४- संगणक अग्रीम | ३०००० | ० | १८००० | १८००० |
| **एकूण** | **११७२८०१** | **३८०९३२** | **७०३६८०.६** | **१७७७४८.६** |

२. उपरोक्त तक्त्यामध्ये रकाना क्र.६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे विवरणपत्र "अ"प्रमाणे सदर निधी गृह विभाग (खुद्द ) व क्षेत्रीय कार्यालयाच्या नियंत्रण अधिका-यांना खर्च करण्याच्या अनुषंगाने देण्यात आलेला संकेतांक क्रमांक व कोषागार क्रमांक या खाली स्वतंत्रपणे अर्थसंकल्प संगणकीय वितरण प्रणालीद्वारे वितरीत करण्यात येत आहे.

३. उपलब्ध करुन दिलेल्या वरील रक्कमेचा खर्च ताळमेळ, महालेखापाल यांच्या कार्यालयास नोंदविलेल्या खर्चाशी महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका प्रकरण १४ मधील नियम १५७ च्या परिशिष्ट-३ तसेच शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार योग्य प्रकारे व योग्यवेळी करुन त्याबाबतची प्रमाणित माहिती शासनास विहित मुदतीत पाठविण्यात यावी. खर्च मेळाची माहिती महालेखापाल यांच्या कार्यालयाकडून प्रमाणित करुन पाठविण्याची संपूर्ण जबाबदारी विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुखांची राहील. उपलब्ध केलेला निधी वित्त विभागाच्या दि.८ जुलै,२०१९ च्या परिपत्रकातील अटी व शर्तींच्या अधीन राहून खर्च करणे बंधनकारक राहील.

४. मागणी क्रमांक- बी- ११,मुख्य लेखाशीर्ष ७६१०- शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे या लेखाशीर्षाखालील २०१- घरबांधणी अग्रिम व २०२- मोटार वाहन,२०३-इतर वाहन अग्रिम व २०४

संगणक अग्रिम या गौणशीर्षनिहाय अग्रिमांची प्रकरणे संबधित नियमांच्या अधीन राहून उपलब्ध निधीच्या मर्यादेत मंजूर करावीत.

५. सदर शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-१ वित्त विभाग शासन निर्णय क्र.विअप्र -२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२,दि.१७/४/२०१५च्या, शासननिर्णयान्वये विभागास प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारांच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( नारायण बि.माने )**
कार्यासन अधिकारी,गृह विभाग.

प्रति,

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
महासमादेशक, होमगार्ड, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, नागरी संरक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई.
संचालक, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक,अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
प्रबंधक, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई.
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा) महाराष्ट्र राज्य-१/२, मुंबई/नागपूर.
अवर सचिव, वित्त विभाग, अर्थसंकल्प-३, मंत्रालय, मुंबई.
उप सचिव (आस्था-२) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
अवर सचिव (रोखशाखा/बीयुडी-१) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती (आस्था-१),गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

शासन निर्णय क्र.- बीयुडी ०५१९/प्र.क्र.१४५/आस्था-१,दि.१५नोव्हेंबर,२०१९ सोबतचे विवरणपत्र-१

सन २०१९-२० मुख्य लेखाशिर्ष ७६१०- शासकीय कर्मचारी इ. ना कर्जे

( रुपये हजारात )

| अ. क्र. | कार्यालयाचे नाव | घरबांधणी अग्रीम: २०१९-२० अर्थसंकल्पीय तरतूद | घरबांधणी अग्रीम: ६०% मंजूर अनुदान | घरबांधणी अग्रीम: एक तृतीयांश वितरित अनुदान | घरबांधणी अग्रीम: ६०% च्या मर्यादेत प्रस्तावित अनुदान | मोटार वाहन अग्रीम: २०१९-२० अर्थसंकल्पीय तरतूद | मोटार वाहन अग्रीम: ६०% मंजूर अनुदान | मोटार वाहन अग्रीम: एक तृतीयांश वितरित अनुदान | मोटार वाहन अग्रीम: ६०% च्या मर्यादेत प्रस्तावित अनुदान | इतर वाहन अग्रीम: २०१९-२० अर्थसंकल्पीय तरतूद | इतर वाहन अग्रीम: ६०% मंजूर व प्रस्तावित अनुदान | संगणक अग्रीम: २०१९-२० अर्थसंकल्पीय तरतूद | संगणक अग्रीम: ६०% मंजूर व प्रस्तावित अनुदान | ६०% च्या मर्यादेत एकूण प्रस्तावित अनुदान |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | गृह विभाग (खुद्द), (आस्था-१) | ५०००० | ३०००० | ३०००० | ० | ५०० | ३०० | १६० | १४० | ० | ० | १०० | ५० | १९० |
| २ | पोलीस महासंचालक, म. रा., मुंबई | २५०००० | १५०००० | १००००० | ५०००० | १०००० | ५४००० | ३०३३२ | २३६६८ | १ | ०.६ | २४७६० | १४८५० | ८८५१८.६ |
| ३ | महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई | ८०००० | ४८००० | २७००० | २१००० | १००० | ६०० | ३०० | ३०० | ० | ० | २०० | १२० | २१४२० |
| ४ | अपर पोलीस महासंचालक,दहशतवाद विरोधी पथक , मुंबई. | ० | ० | ० | ० | २००० | १२०० | ६५० | ५५० | ० | ० | ४०० | २४० | ७९० |
| ५ | पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई. | ४००००० | २४०००० | १०००० | ० | ३५०० | २१०० | ११०० | १००० | ० | ० | १४०० | ८४० | १८४० |
| ६ | अपर पोलीस महासंचालक तथा कारागृह महानिरीक्षक,पुणे. | १७०००० | १०२००० | ६०००० | ४२००० | ८००० | ४८०० | २५०० | २३०० | ० | ० | ६०० | ३६० | ४४६६० |
| ७ | महासमादेशक, होमगार्डस, म.रा. मुंबई | ६००० | ३६०० | ६००० | ० | ५०० | ३०० | १५० | १५० | ० | ० | २०० | १२० | २७० |
| ८ | संचालक,नागरी संरक्षण संचालनालय, मुंबई | ४००० | २४०० | ४००० | ० | २०० | १२० | ६५ | ५५ | ० | ० | १०० | ६० | ११५ |
| ९ | परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य,मुंबई | ५००० | ३००० | ५००० | ० | ६०० | ३६० | २०० | १६० | ० | ० | १००० | ६०० | ७६० |
| १० | आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, म.रा. मुंबई | ३०००० | १८००० | १०००० | ८००० | ५०० | ३०० | १५० | १५० | ० | ० | ३०० | १८० | ८३३० |
| ११ | संचालक,न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा,म.रा. मुंबई | २०००० | १२००० | ७००० | ५००० | ७०० | ४२० | २२५ | १९५ | ० | ० | ४०० | २४० | ५४३५ |
| १२ | संचालक,अभियोग संचलनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई | १५००० | ९००० | ५००० | ४००० | ३०० | १८० | १०० | ८० | ० | ० | ५०० | ३०० | ४३८० |
| १३ | प्रबंधक, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई | ५००० | ३००० | ५००० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २० | २० | २० |
| १४ | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड,मुंबई. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २० | २० | २० |
| १५ | सचिव, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, म. रा.मुंबई. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १६ | प्रबंधक, राज्य परिवहन अपिल न्यायाधिकरण, मुंबई | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **एकूण** | **१०३५०००** | **६२१०००** | **२६९०००** | **१३००००** | **१०७८००** | **६४६८०** | **३५९३२** | **२८७४८** | **१** | **०.६** | **३००००** | **१८०००** | **१७६७४८.६** |

**तात्काळ/कालमर्यादा/महत्त्वाचे**

क्रमांक -पोमसं/३१/३९-४/संगणक अग्रीम (२०१९-२०)/१२६/२०१९, मुंबई, दि. १२/०३/२०२०

## आदेश

शासन निर्णय, गृह विभाग, क्र.बीयुडी - ०५१९/प्र.क्र.१४५/आस्था-१, दि.१५/११/२०१९ अन्वये सन २०१९-२० या वित्तीय वर्षाकरिता रु. **१,४७,८०,०००/-** (अक्षरी रु. एक कोटी सत्तेचाळीस लाख ऐंशी हजार फक्त) एवढा निधी शासनाने मागणी क्र.बी-११, मुख्यलेखाशिर्ष- " ७६१०- शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे" गौणशिर्ष-२०४ या लेखाशिर्षाखाली संगणक अग्रिमाकरीता चिन्हांकित करुन दिलेला आहे. सदर निधीपैकी रु.१,१५,६०,०००/- (अक्षरी रु.एक कोटी पंधरा लाख साठ हजार फक्त ) निधीचे घटक कार्यालयांना वाटप करण्यात आले आहे. सदर निधीतून रु.३४,५०,०००/- एवढ्या शिल्लक/अखर्चित राहिलेल्या रु.३४,४०,०००/- (रु.चौतीस लाख चाळीस हजार फक्त) इतका निधी **संबंधित विभाग प्रमुख / प्रादेशिक कार्यालय प्रमुख यांचे आस्थापनेवरील संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांना संगणक अग्रिम वाटप करण्याकरिता बी.डी.एस. प्रणालीवर सोबतच्या विवरणपत्राप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येत आहे.**

२. सदर शासन निर्णयानुसार शासनाने चिन्हांकित करुन दिलेल्या रु.१,४७,८०,०००/- (अक्षरी रु. एक कोटी चाळीस लाख फक्त) एवढ्या निधीपैकी रु.३४,५०,०००/- एवढ्या शिल्लक/अखर्चित राहिलेल्या निधीतून रु.३४,४०,०००/- (रु.चौतीस लाख चाळीस हजार फक्त) इतक्या निधीचे सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविल्याप्रमाणे संबंधित विभाग प्रमुख/प्रादेशिक कार्यालय प्रमुख यांनी त्यांच्या आस्थापनेवरील संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांना, शासन निर्णय वित्त विभाग, क्र.अग्रिम-१०११/ प्र.क्र.५०/ २०११/ विनियम, दि.०३/०२/२०१२ अन्वये अग्रीमाची रक्कम जास्तीत जास्त रु. २०,०००/- ( रुपये वीस हजार फक्त ) किंवा संगणक/लॅपटॉप/टॅबलेट संगणकाची प्रत्यक्ष किंमत, यापैकी जी कमी असेल त्या रकमेचे संगणक अग्रिमाकरिता वाटप करावे.

३. विभाग प्रमुख/प्रादेशिक कार्यालय प्रमुखांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे त्यांच्या आस्थापनेवरील संबंधित अधिकारी /कर्मचाऱ्यांना शासन निर्णय वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३ विनियम, दिनांक १७/४/२०१५ अन्वये मुंबई वित्तिय नियम १९५९ मधील तरतुदीनुसार प्रदान करण्यात आलेल्या, तसेच वित्तिय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उप विभाग-एक, मधील अनुक्रमांक १३ नियम १३६,१३७ व १३९ अन्वये संगणक अग्रिम मंजूरीचे आदेश निर्गमित करावेत. त्यामध्ये शासन निर्णय वित्त विभाग क्र.अग्रिम-१०११/प्र.क्र.५०/२०११/विनियम, दि. ०३/०२/२०१२ मधील विहित अटी / शर्तींचा समावेश करावा.

४. **विभाग प्रमुख/ प्रादेशिक कार्यालय प्रमुखांना सूचित करण्यात येते की, शासन वित्त विभाग, क्र. अग्रिम-१०११/ प्र.क्र.५०/ २०११/विनियम, दि. ०३/०२/२०१२ अन्वये विहित केलेल्या अटी व शर्तींची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. सदर शासन निर्णयातील अट क्र. ९ मधील विहित तरतुदीनुसार संगणक खरेदीबाबत आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे संगणक अग्रिम प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एका महिन्याच्या आत संबंधीत कर्मचाऱ्यांकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील. तसे न केल्यास अग्रिम धारकाकडून अग्रिमाची संपूर्ण रक्कम १७.७५% व्याजदराने एक रकमी वसूल करण्यात येईल, असे मंजूरी आदेशात नमुद करावे. अग्रिम मंजूर करताना मुंबई वित्तीय नियम-१९५९ मधील नियम १२४(बी) व वित्त विभाग, शासन निर्णय क्र. अग्रिम-१०९५/प्र.क्र.७०/९५/विनियम, दि. २६.०९.१९९७ मध्ये नमूद तसेच, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार लागू ठरणाऱ्या दंडनीय व्याजाचा उल्लेख मंजूरीच्या आदेशात करण्यात यावा.**

५. शासनाने, सदर शासन निर्णयान्वये चिन्हांकित करुन दिलेल्या निधीचा विनियोग दि. ३१/३/२०२० पर्यंत होणे आवश्यक आहे. सर्व घटक प्रमुखांना निर्देशित करण्यात येते की, देयके दि.३१/३/२०२० पूर्वी कोषागारात सादर करण्यात यावीत.

६. सदर निधीचा विनियोग पुर्णत: न केल्यास किंवा व्यपगत झाल्यास त्याची सविस्तर कारणे शासनास व लोकलेखा समितीस सादर करावी लागतात. तरी निर्देश देण्यात येत आहेत की, विभाग प्रमुख/प्रादेशिक कार्यालय प्रमुख यांनी त्यांच्या आस्थापनेवरील संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांचे संगणक अग्रिम मंजूरी संबंधीचे आदेश त्वरीत निर्गमित करावेत. तसेच, आहरण व संवितरण अधिकारी यांनी संबंधित कोषागार कार्यालयास त्यासंबंधीची देयके सादर करुन सदरची देयके कोणत्याही परिस्थितीत दि. ३१/३/२०२० पूर्वी पारित करुन घ्यावीत. तसेच संबंधीत अधिकारी/ कर्मचाऱ्याला अग्रिम रक्कम अदा करणे ही सर्वस्वी जबाबदारी सर्व संबंधित घटक प्रमुखांची असल्यामुळे त्यांनी सदर प्रकरणांची तातडी व गांभीर्य लक्षात घेऊन व या प्रकरणी वैयक्तीकरित्या लक्ष देऊन त्यांचे कार्यालयातील लेखा विषयक कामकाज हाताळणारे लेखा अधिकारी/ सहाय्यक लेखा अधिकारी /लिपिक वर्गीय अधिकारी /कर्मचारी यांनी स्वत: लक्ष देऊन त्याप्रमाणे विहीत कालावधीत अचूक व परिपूर्ण कामे करण्याबाबत सक्त सूचना द्याव्यात. जेणेकरुन शासनाने चिन्हांकित करुन दिलेल्या निधीचा विनियोग पूर्णत: होईल. तसेच शासन वित्त विभाग, क्र. अग्रिम-१०११/ प्र.क्र.५०/ २०११ /विनियम, दि. ०३/०२/२०१२ च्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या अटींचे पालन करुन त्यानुसार संबंधितांना अग्रिमाचे वाटप करण्याची दक्षता घ्यावी. संबंधीतांना अग्रिम रक्कम अदा केल्यानंतर त्याची दिनांकित अदारोल पावती, देयकाचा कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक त्यांचे सेवापुस्तकात/ सेवापटात नोंद करावा आणि या कार्यालयास /शासनास व महालेखापाल-१,मुंबई /महालेखापाल-२, नागपूर/अधिदान व लेखा कार्यालय मुंबई यांना दि.१०/४/२०२० पुर्वी न चुकता तसा अहवाल सादर करावा.

७. असे निर्देश देण्यात येत आहेत की, उपलब्ध करुन दिलेल्या वरील रकमेच्या खर्चाचा ताळमेळ महालेखापाल यांचे कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी/महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका प्रकरण-१४ नियम १५७ च्या परिशिष्ट ३ तसेच शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार योग्य प्रकारे व योग्यवेळी करुन त्याबाबतची प्रमाणित माहिती शासनास विहित मुदतीत पाठविण्यात यावी. व त्यानुसार या कार्यालयाने मंजूर केलेल्या अग्रिमाच्या खर्च मेळ्याची प्रमाणित माहिती दि. १०/४/२०२० पूर्वी महालेखापाल यांचे कार्यालयाकडून प्रमाणित करुन पाठविण्याची संपूर्ण जबाबदारी विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखाची राहील याचीही कृपया नोंद घ्यावी.

८. असेही निर्देश देण्यात येत आहेत की, खर्चमेळ्याची माहिती महालेखापाल यांच्या कार्यालयाकडून प्रमाणित करुन पाठविण्याची संपूर्ण जबाबदारीही क्षेत्रीय विभागीय कार्यालय प्रमुखांची राहील व त्याप्रमाणे माहिती न पाठविणाऱ्या कार्यालयातील संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करणे भाग पडेल यांची कृपया नोंद घ्यावी. प्रमाणित न केलेली माहिती स्वीकारण्यात येणार नाही. या कारणामुळे विलंब झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी क्षेत्रीय विभाग/कार्यालय प्रमुखाची राहील याचीही कृपया नोंद घ्यावी.

९. सदरचा खर्च सन २०१९-२० या वित्तीय वर्षातील गृह विभाग मागणी क्र.बी - ११ मुख्यलेखाशिर्ष " ७६१०- शासकीय कर्मचारी इ.कर्जे " मधील गौणशिर्ष २०४- संगणक अग्रिम (सांकेतांक क्रमांक ७६१०१८५१) अन्वये खर्ची टाकण्यात यावा व वित्तीय वर्ष २०१९-२० च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. सदरचा खर्च याच लेखाशिर्षाखाली नोंदविला गेला आहे, याची खातरजमा करण्याची कृपया नोंद घ्यावी.

(कृष्ण प्रकाश)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, गुन्हा अन्वेषण विभाग, म.राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.राज्य, मुंबई
पोलीस आयुक्त, पुणे शहर/ पिंपरी चिंचवड
पोलीस अधिक्षक, सिंधुदुर्ग / चंद्रपूर / पुणे ग्रामीण / बीड / नाशिक ग्रामीण / अकोला/ चंद्रपूर /अहमदनगर/औरंगाबाद ग्रामीण / लोहमार्ग नागपूर व औरंगाबाद.
समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ पुणे / ६ धुळे / ८ मुंबई.
प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ / अकोला

| अ.क्र. | घटक कार्यालय | विभाग प्रमुख | अर्जदार संख्या | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | समादेशक, रारापोबल गट क्र.६ धुळे | समादेशक, रारापोबल गट क्र.६ धुळे | ८ | १६०००० |
| २ | समादेशक, रारापोबल गट क्र. १ पुणे | समादेशक, रारापोबल गट क्र. १ पुणे | ७ | १४०००० |
| ३ | पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग | पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग | ४१ | ८२०००० |
| ४ | पोलीस अधीक्षक, चंद्रपूर | पोलीस अधीक्षक, चंद्रपूर | १ | २०००० |
| ५ | पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण | पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण | १२ | २४०००० |
| ६ | पोलीस अधीक्षक, बीड | पोलीस अधीक्षक, बीड | ३ | ६०००० |
| ७ | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र मरोळ | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र मरोळ | १ | २०००० |
| ८ | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, अकोला | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, अकोला | १ | २०००० |
| ९ | पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण | पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण | १ | २०००० |
| १० | पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड | पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड | ३ | ६०००० |
| ११ | अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड | अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड | १ | २०००० |
| १२ | पोलीस आयुक्त, पुणे शहर | पोलीस आयंक्त पुणे शहर | २० | ४००००० |
| १३ | पोलीस अधीक्षक, अकोला | पोलीस अधीक्षक, अकोला | ३ | ६०००० |
| १४ | पोलीस अधीक्षक, लोहमार्ग औरंगाबाद | पोलीस अधीक्षक, लोहमार्ग औरंगाबाद | ६ | १२०००० |
| १५ | अपोमसं गु.अ.वि., म.राज्य, पुणे | अपोमसं गु.अ.वि., म.राज्य, पुणे | १ | २०००० |
| १६ | पोलीस अधीक्षक, चंद्रपूर | पोलीस अधीक्षक, चंद्रपूर | ५ | १००००० |
| १७ | पोलीस अधीक्षक, अहमदनगर | पोलीस अधीक्षक, अहमदनगर | ५ | १००००० |
| १८ | समादेशक, रारापोबल गट क्र. ८ मुंबई | समादेशक, रारापोबल गट क्र. ८ मुंबई | ३० | ६००००० |
| १९ | पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण | पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण | ८ | १६०००० |
| २० | पोलीस अधीक्षक, लोहमार्ग नागपूर | पोलीस अधीक्षक, लोहमार्ग नागपूर | १५ | ३००००० |
| | | | **एकूण** | **३४४००००** |